वाशीम ग्रामीण ती मुलगी पालकांच्या स्वाधीन दि. २५/०२/२०२०

# 'ती' मुलगी पालकांच्या स्वाधीन

**वाशिम :** २७ जानेवारी रोजी फूस लावून पळवून नेलेल्या सोनखास येथील एका १८ वर्षीय मुलीला शोधण्यात वाशिम ग्रामीण पोलीस स्टेशनला २१ फेब्रुवारी रोजी यश आले असून, या मुलीला २२ फेब्रुवारी रोजी तिच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले.

सोनखास येथील १८ वर्षीय मुलगी ही वाशिम येथील एका महाविद्यालयात इयत्ता बारावीत शिकत आहे. कॉलेजला जाते, असे सांगून ती २७ जानेवारी रोजी घराबाहेर पडली. सायंकाळी उशिरापर्यंत घरी परत न आल्याने तिला अज्ञात इसमाने फूस लावून पळवून नेल्याची तक्रार पीडित मुलीच्या वडिलांनी वाशिम ग्रामीण पोलीस स्टेशनला दिली. यावरुन भादंवी कलम ३६३ नुसार गुन्हा दाखल करून पोलीस अधीक्षक वसंत परदेशी, अपर पोलीस अधीक्षक विजयकुमार चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. पवन बनसोड यांचे मार्गदर्शनात ठाणेदार संजय शिपणे यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरविली. तपास अधिकारी तथा सहायक पोलीस निरीक्षक महेश मछले यांच्या चमूने नाशिक पोलिसांच्या मदतीने २१ फेब्रुवारी रोजी त्या मुलीला नाशिक येथून ताब्यात घेतले. २२ फेब्रुवारी रोजी सदर मुलीला तिच्या आई-वडीलांच्या ताब्यात देण्यात आले. (प्रतिनिधी)